
# ३. आपण सारे खेळू

7Z4KHU

- प्रत्येक चित्रात काय काय दिसते ते सांगा.
- गोष्ट ऐका. गोष्ट सांगा.



अंगणात मुले चेंडू खेळत होती. रोझी एकटीच बसून खेळ बघत होती.



रोझीची आई अंगणात आली. ती म्हणाली, ''रोझीला खेळायला घ्या ना. ती एकटीच बसून आहे.''




एक मुलगी म्हणाली, ''तिच्याबरोबर कसं खेळायचं ? तिला नीट चालता येत नाही.''

हे ऐकून रोझीच्या आईला वाईट वाटले. ती घरात परत गेली.

रोझी कधी खेळाकडे तर कधी इकडे तिकडे बघू लागली.

कुत्र्याचे एक पिलू अचानक रोझीकडे आले. रोझीने पिलाकडे पाहिले. 'अय्या ! किती गोंडस पिलू आहे हे !' तिने आईला हाक मारली, ''आई, लवकर बाहेर ये ना !''





आई बाहेर आली. पिलाला पाहिले. त्याला कुरवाळले.

''आई, आपण हे पिलू आपल्याकडेच ठेवूया.'' रोझी म्हणाली.

''रोझी, पिलू खरंच खूप गोंडस आहे. ते आपल्याकडे ठेवू. ते तुझ्याबरोबर खेळेल. तू पिलाकडे लक्ष ठेव. तू त्याला रोज खाऊपिऊ घाल, म्हणजे त्याला तुझा लळा लागेल. मी तुला मदत करीन.'' आई म्हणाली.



मुलांचा खेळ संपला. ती आपसात बोलू लागली. तेवढ्यात रोझीच्या घरातून कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाज आला. मुलगा म्हणाला, ''चला, आपण रोझीकडे जाऊ. तिच्या घरी कुत्र्याचं पिलू आहे. ते आपण पाहू.''





एक मुलगी रोझीला म्हणाली, ''किती छान पिलू आहे. हे कुठून आणलंस?''

''अगं आणलं नाही, आलंय असंच.'' रोझी म्हणाली.

''हे बघ, तुझ्या पिलासाठी आम्ही खाऊ आणू आणि रोज तुझ्याकडे येत जाऊ, पिलाशी आणि तुझ्याशी खेळायला.'' एक मुलगी म्हणाली. रोझीला आनंद झाला.

''बरं झालं रोझी ! या पिलामुळे तुला सगळ्यांबरोबर खेळायला मिळेल.'' आई म्हणाली.



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना एकेक चित्र पाहायला सांगावे. प्रत्येक चित्रात काय काय दिसते ते विचारावे. प्रत्येक चित्राशेजारील मजकूर वाचून दाखवावा. विद्यार्थ्यांना गोष्ट सलगपणे सांगायला लावावी.